# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-१५८ दिनांक - २६/०४/२०२४

**" खून, गँग रेप व जबर मारहाण या वेगवेगळया ३ गुन्हयातील पाहीजे आरोपीस १३ वर्षानंतर अटक करण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश. "**

दिनांक २२/११/२०१२ रोजी धानिवबाग, गांगडीपाडा, रशिद कंम्पाउण्ड, नालासोपारा पुर्व या ठिकाणी आरोपीत यांनी चोर समजुन एका इसमास जबर मारहाण करुन त्यास जिवेठार मारुन त्याची ओळख पटवु नये या उददेशाने नग्न अवस्थेत टाकुन दिले होते. त्या अनुषंगाने वालिव पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं ३८७/१२ भा.दं.वि क ३०२,२०१,१४३,१४७,१४८,१४९ सह मुंबई पोलीस अधिनियम ३७(१)(३),१३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तसेच दिनांक १०/०९/२०१५ रोजी २० वर्षे वयाचे तरुण मुलीस रिक्षात बसवून घाटकोपरला नेत असताना रिक्षा चालक व त्याचे इतर साथिदार यांनी संगनमत करून तिला जबरदस्तीने नालासोपारा या ठिकाणी घेवून जावून त्यांनी तिचेवर सामूहीक बलात्कार केला होता. त्या अनुषंगाने निर्मल नगर पोलीस स्टेशन, मुंबई शहर गुन्हा रजि नं २२५/१२ भा.द.वि क ३७६(ड), ३६६, ३४१, ५०६, ५०६(२), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तसेच दिनांक ०४/०८/२०१२ रोजी धानीवबाग, नालासोपारा पुर्व या ठिकाणी यातील फिर्यादी याने त्याचे स्वत:चे घरात आरोपी यांना न विचारता भाडेकरू ठेवला या कारणावरुन आरोपी व इतर साथिदार यांनी मिळून लोखंडी सळईने फिर्यादीस जबर मारहाण करून त्याचे डोक्यात व पायाचे नडगीवर गंभीर दुखापत केली होती. त्याअनुषंगाने वालिव पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं २२५/१२ भा.दं.वि क ३२६, ३२५, ४२७, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मा.वरीष्ठ अधिका-यांनी गंभीर व संवेदनशील गुन्हयातील पाहीजे आरोपीचा शोध घेणेबाबत आदेश केले आहे. वरील तिन्ही गुन्हे हे अतिशय गंभीर स्वरुपाचे होते व नमुद तिन्ही गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे अक्रम रियासत अली खान ऊर्फ शेख याचा यापुर्वी सर्वोतोपरी शोध घेऊन देखील तो गेल्या १३ वर्षापासुन मिळुन येत नव्हता. त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेतील सपोनि/ दत्तात्रय सरक ,पोहवा/शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, अकील सुतार यांनी सदर गुन्हयाची वालीव पोलीस ठाणेतुन माहीती घेऊन यातील पाहीजे आरोपी याचेबाबत सखोल तपास करुन गोपनीय माहीती प्राप्त केली व सलग ०२ महिन्यांपासुन अहोरात्र मेहनत घेवुन व तांत्रिक विश्लेषन करुन तपासात सातत्य ठेवून आरोपी विषयी सर्व आवश्यक माहिति प्राप्त करून सापळा लावुन आरोपी नामे अक्रम रियासत अली खान ऊर्फ शेख, वय ३६ वर्षे, राह. रुम नं ७०५, अ विंग, ग्रीन हाईट, आचार गल्ली, शिळफाटा, म्रुंबा, जि. ठाणे मुळ राह ता. रुघौली, जि. बस्ती, राज्य उत्तरप्रदेश यास दिनांक २५/४/२०२४ रोजी ताब्यात घेवुन त्याचेकडे वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने तपास केला असता त्याचा खालील ३ गुन्हयात सक्रिय सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.

१) वालिव पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं ३८७/१२ भा.द.वि क ३०२, २०१,१४३, १४७, १४८, १४९ सह मुंबई पोलीस अधिनियम ३७ (१)(३),१३५

२) वालिव पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं २२५/१२ भा.द.वि क ३२६, ३२५, ४२७, ३४

३) निर्मल नगर पोलीस स्टेशन, मुंबई शहर गुन्हा रजि नं २२५/१२ भा.द.वि क ३७६(ड), ३६६, ३४१, ५०६, ५०६(२), ३४

सदर आरोपीतास पुढील कारवाई करीता वालीव पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले असुन त्यास अटक करण्यात आलेली आहे. अशा प्रकारे खून, गँग रेप व जबर मारहाण गुन्हयातील गेले १३ वर्षापासून पाहीजे असणाऱ्या आरोपीस पकडण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश आले आहे.

सदर कारवाई पोलीस उप आयुक्त, श्री. अविनाश अंबुरे, सहा. पोलीस आयुक्त, श्री. मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलिस निरीक्षक, राहुल राख, पोनि धनंजय पोरे, सपोनि दत्तात्रय सरक, नितीन बेंद्रे पोउपनि नितीन विचारे, सफौ श्रीमंत जेधे, पोहवा/मनोहर तावरे, आसिफ मुल्ला, संतोष मदने, शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, अकील सुतार, प्रविणराज पवार, राजविर संधु, सतिष जगताप, अनिल नांगरे, राजाराम काळे, महेश वेल्हे, संग्राम गायकवाड, हनुमंत सुर्यवंशी पोशि नितीन राठोड, साकेत माघाडे, अंगद मुळे मसुब सचीन चौधरी सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा, सहा.पो.उप.निरी. संतोष चव्हाण,सायबर सेल, यांनी यशस्वी कामगिरी केली आहे.